Vol 6 Issue 12 June 2017

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052(UIF)

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

VOLUME - 6 | ISSUE - 12 | JUNE - 2017

# इतिहासलेखनाच्या अनुषंगाने शिवकालीन बखरींची साधनमूल्यता: एक्क्यान्नव कलमी बखरीच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास



प्रा. विजय रामराव पांडे
विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक,
इतिहास विभाग, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,
फुलंब्री जि. औरंगाबाद.

## प्रस्तावना :

मध्ययुगीन भारताच्या इतिहास म्हणजे अंधकारमय युग होते असे काही इतिहासकार मानतात. परंतु मध्ययुगातही काही बाबी अशा घडलेल्या दिसतात की इतिहासकारांच्या या मताला छेद जातांना दिसून येतो. मध्यकाळामध्येही अनेक प्रकारची नवनिर्मिती झालेली आपणास दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांनी मध्ययुगात स्थापन केलेले स्वराज्य आणि त्यातून मराठी मनामध्ये प्रज्वलित झालेले स्फूलिंग, नवचैतन्य हा त्या नवनिर्मितीचाच एक भाग होता. छत्रपतींनी स्थापलेल्या स्वराज्याने, मराठी माणसाच्या पराक्रमाने मराठी माणसावरच नव्हे, तर भारतातील इतर सत्ताधीश व जनमाणसावरही छाप पाडली होती. त्याचाच परिणाम म्हणून छत्रपतींचा हा पराक्रम, मराठी माणसाचे शौर्य वेगवेगळ्या स्वरूपात लिहिले जाऊ लागले, गायले जाऊ लागले, कथन केले जाऊ लागले. स्वराज्यावर चाल करून आलेल्या शत्रूंचे खाफीखानसारखे दरबारी इतिहासकार व इतरही स्वराज्याविषयी, छत्रपती शिवाजी महाराजांविषयी गौरवोद्गाराने लिहू लागले. हे शौर्य, हा पराक्रम सांगण्यास मराठी माणूस कसा मागे राहणार! त्यांनीही या पराक्रमावर पोवाडे लिहायला, गायला सुरूवात केली. मुस्लिम लेखकांकडून प्रेरणा घेऊन बखरी लिहिल्या गेल्या. शिवचरित्रावर भाष्य करणाऱ्या ह्या सर्व बखरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर लिहिल्या गेल्या. घटना घडून गेल्यानंतरच्या कालावधीत त्यांचे लिखाण झाले असल्याने या शोधनिबंधात बखरींचे साधनमूल्य तपासण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिवछत्रपतींच्या चरित्रकाळापासून सुरू झालेल्या बखरी मराठा सत्ता अस्तित्वात असेपर्यंत लिहिल्या गेल्या. त्यामुळे त्यांची संख्या जवळपास दोनशे आहे. त्यामुळे संशोधनाच्या व्याप्तीच्या अनुषंगाने या शोधनिबंधात एक्क्यान्नव कलमी बखरीचेच साधनमूल्य अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी इतर बखरींचीही अभ्यासाच्या दृष्टीने मदत घेतलेली आहे.

मराठेकालीन बखरींचे अनेक संपादकांनी संपादन केलेले आहे. सभासद बखर व श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे ह्या र. वि. हेरवाडकर यांनी, श्रीमंत महाराज भोसले यांची बखर ही विनायक लक्ष्मण भावे यांनी, चिटणीस बखरीचे रा. ब. किर्तने, साने व प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी केलेले आहे. एक्क्यान्नव कलमी बखरीचे संपादन विनायक सदाशिव वाकसकर यांनी केलेले आहे. तर इतिहासाचार्य म्हणून परिचित असलेले विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी अनेक बखरींचे संकलन व संपादनही केलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम वर्णित करण्याच्या उद्देशाने व मुस्लिम लेखकांच्या तवारिखांपासून प्रेरणा घेऊन सुरूवात झालेले मराठी बखरींचे लेखन हे पुढे मराठी सत्ता अस्तित्वात असेपर्यंत चालू राहिले. यु. म. पठाण यांच्या मते "फार्सीमध्ये इतिहासलेखनाचे विविध प्रकार होते...तारीख–तवारिखा, अखबार, नामे, कैफियती, वाके, बातमीपत्रे, कुळकथा–वंशावळी, हकीकत इ. या सर्वांचाच प्रभाव समकालीन व उत्तरकालीन मराठी इतिहासलेखनावर पडल्याचे त्यांच्या नावावरूनही लक्षात येईल. हे प्रकार–उपप्रकार व त्यांची प्रकृती मूलतः भिन्न आहे...त्यावरून मूळ फार्सी इतिहासलेखन प्रकारांनी मराठीत किती विविध रूपे घेतली, याचीही कल्पना येईल."[1] आज्ञापत्रकार रामचंद्रपंत अमात्य म्हणतात, "ज्या राज्यावर अवरंगजेबा सारिखा सबळ शत्रू चालोन आला आसतां हतप्रभ होऊन गेला तें हें राज्य औरंगजेब याणी या राज्यानिमित्त आपला संपूर्ण पराक्रम व आर्थ वैभवादि सर्व शक्ति वेचली तथापि श्री कृपा कटाक्ष विक्षणे सकलहि निर्फळ होऊन परिणामीं हतोद्यम हतोत्साह होत्सातां पराङ्मुख होऊन यमालयाश्रयास गेला"[2] व "देश दुर्गादि सैन्याचे बंद नवेच निर्माण करून येकरूप अव्याहत शासन चालविलें केवळ नूतन सृष्टिच निर्माण केली औरंगजेबा सारिखे महा शत्रूस स्वप्रताप सागरी निमग्न केला दिगांत विख्यात कीर्ति संपादिली"[3] अशा या मराठी राज्याचा पराक्रम व छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या लोकोत्तर कार्याची कीर्ति, महती हा प्रारंभीच्या बखरींचा विषय होता. मराठी बखरी ह्या विविध अंगानी लिहिल्या गेल्या. ज्यामध्ये व्यक्तिंवर आधारित म्हणजे चरित्रस्वरूपाच्या बखरी, विशिष्ठ प्रसंगावर आधारित बखरी, आत्मचरित्रपर बखरी, स्थळांचे वर्णन करणाऱ्या बखरी अशा विविध अंगानी बखरी निर्माण झाल्या. यामध्ये सभासद बखर, एक्क्यान्नव कलमी बखर, भाऊसाहेबांची बखर, चिटणीस बखर, पानिपतची बखर या बखरी या प्रमुख बखरींसह जवळपास दोनशे बखरींची निर्मिती महाराष्ट्रात झाली.

एक्क्यान्नव कलमी बखरीचा लेखनकाळ हा या बखरीचे संपादक विनायक सदाशिव वाकसकर यांनी 1686 नंतर पण इ.स. 1707

पूर्वी केंव्हातरी लिहिली असावी असे वाटते[4] असा नोंदवला आहे. त्यामुळे ही बखर शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर व औरंगजेबाच्या मृत्यूपूर्वी लिहिली असावी. तर गजानन मेहेंदळे यांनी ही बखर 1735 नंतर आणि बहुधा इ.स. 1764 पूर्वी, म्हणजे साधारणपणे इ. स. 1750 च्या सुमारास, लिहिलेली असल्याचे मानतात.[5] ही बखर दत्ताजी त्रिमल वाकेनिवीस यांनी लिहिली व नंतर खंडो अनाजी मलकर यांनी नकलवली अशा प्रकारचा उल्लेख बखरीतील एक्क्यान्नवव्या कलमात "सदरहू आख्यान नवद प्रकरणे पुण्यश्लोक राजा त्याची कथा दत्ताजी वाकेनिवीस त्यांपासी तपशिलवार लिहिली होती. त्यांपासून खंडो अनाजी मलकरे यांणी हस्ताक्षरे तालिक लिहिली असे"[6] असा मिळतो. एकतर ही बखर नकलवलेली असल्याने त्यात काही थोडेफार बदल केलेले असू शकतात. दुसरी बाब म्हणजे ह्या बखरीचा लेखनकाळ हा सभासद बखरीच्या नंतरचा आहे. शिवाय सभासदाने शिवछत्रपतींचा कार्यकाळ, पराक्रम स्वतः पाहिलेला आहे. त्यामुळे सभासद बखरीची विश्वसनीयता जास्त आहे. परंतु सभासद बखरीनंतर इतर बखरींपेक्षा एक्क्यान्नव बखर ही विश्वसनीय मानली जाते. नंतरच्या कालखंडात निर्माण झालेल्या बखरींपैकी अनेकांनी सभासद बखर व एक्क्यान्नव कलमी बखरीचा लेखनासाठी उपयोग केल्याचे दिसते. चिटणीस बखर लिहितांना "मल्हाररावांनी सभासदाबरोबरच अनेक ठिकाणी 91 कलमी बखरीचा वापर केला आहे"[7] असे चिटणीस बखरीला दिलेल्या प्रस्तावनेत प्रा. भीमराव कुलकर्णी नमुद करतात. एक्क्यान्नव कलमी बखरीलाच रायरीची बखर, मराठी साम्राज्याची छोटी बखर, शहाण्णव कलमी बखर या नावांनीही ओळखले जाते. हिच्या सात मराठी, एक इंग्रजी अनुवादरूप आणि दोन फार्सी अनुवादरूप अशा निदान दहा प्रती ज्ञात आहेत. ही बखर जॉर्ज फॉरेस्ट यांच्या सिलेक्शन्स फ्रॉम द लेटर्स, डिस्पॅचेस अ‍ॅड अदर स्टेट पेपर्स प्रिझर्व्हड इन द बॉम्बे सेक्रेटरीएट, मराठा सिरीज खंड 1 मधील पहिले प्रकरण म्हणजे या बखरीचे इंग्रजी भाषांतर आहे जे 1885 मध्ये प्रकाशित झाले.[8] काव्येतिहास संग्रह मासिकात मराठी साम्राज्याची छोटी बखर या नावाने 1888 मध्ये, पारसनीस यांनी भारतवर्ष मासिकात शिवछत्रपतीची 91 कलमी बखर या नावाने 1897 मध्ये, शहाण्णव कलमी बखर या नावाने 1903 मध्ये, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी प्रभात मासिकात श्रीशिवछत्रपतींची बखर या नावाने 1907 मध्ये, लंडन येथील इंडिया ऑफिसच्या ग्रंथालयातील क्र. 1957 च्या फार्सी हस्तलिखिताचे सर जदुनाथ सरकार यांनी मॉडर्न रिव्ह्यू मासिकात 1907 मध्ये प्रकाशित केलेले भाषांतर, हे फार्सी हस्तलिखित म्हणजे एक्क्याण्णव कलमी बखरीचे फार्सी भाषांतर, एम. एम. कोटस्थाने यांनी शिवाजीची बखर या नावाने 1935 मध्ये प्रकाशित केलेली आहेत. या सर्व संपादित आवृत्यांमध्ये जी कलम संख्या प्रकाशित केलेली आहे, ती वेगवेगळी आहे. तसेच काहींमधील मधली जी कलमे आहेत ती दिलेली नाहित.

लिपीच्या दृष्टीने पाहता बखरी ह्या मोडी लिपीत लिहिलेल्या आहेत. जलद गतीने लिहिण्यास उपयुक्त असलेल्या या लिपीमध्ये कित्येक अक्षरांमध्ये सारखेपणा आहे. कारकुनी कामासाठी ही लिपी रूढ झाल्यामुळे मोडी लिपीमुळे मराठी भाषेला एक निराळेच वळण लागले आहे. ऱ्हस्वदीर्घांचा विधिनिषेध न पाळता सारीच रूपे दीर्घ लिहावयाची व विरामचिन्हांचा वापर करावयाचा नाही, या पद्धतीमुळे ह्या बखरी संपादितांना अनेक अडचणी येतात. अर्थसुलभतेसाठी विरामचिन्हांचा वापर करावा लागतो, परंतु त्यामुळे काही ठिकाणी थोडेबहुत घोटाळेही होतात.[9] ते काही प्रमाणात या बखरीतही असलेले दिसून येतात.

बखरींवर जी टीका केली जाते त्यामध्ये काळ व स्थळांचा निश्चित स्वरूपाचा अभाव ही एक टीका होय. एक्क्याण्णव कलमी बखरीतही स्थळकाळाचा दोष राहिलेला दिसून येतो. सदरील बखरीत तीन ठिकाणी वर्षांचा उल्लेख केलेला दिसून येतो. ज्यापैकी प्रथम हा शिवाजीराजे त्यांचा जन्म जाला शके 1559 क्षये नाम संवत्सरे वैशाख शुद्ध पंचमी चंद्रवार[10] हा उल्लेख कलम 15 मध्ये येतो. तर कलम 87 मध्ये राज्याभिषेकाची तिथी सांगतांना शके 1596 आंनदनाम संवछरे चैत्र सुध प्रतीपदा शुक्रवार[11] अशी दिली आहे. पैकी शिवाजी महाराजांचा जन्म या बखरीनुसार वि. का. राजवाडे यांनी मान्य केली होती. परंतु जेधे शकावली व शिवभारत यामध्ये दिलेली तिथी, वार यातील सुसंगती बघता ही तिथी विसंगत आहे असे वाटते. तर शिवछत्रपतींचा राज्याभिषेक शुक्रवारी नव्हे तर शनिवारी झाला. स्थळविपर्यासाचा या बखरीच्या संदर्भाने विचार करता बखरकाराने कलम 51 मध्ये शिवाजीराजे व संभाजीराजे यांशी दिलीस जावें असा करार करून तहनामा जाइला[12] तर कलम 52 मध्ये राजे दिलीस दाखल जाल13 असे लिहिले. वास्तविक पाहता शिवाजी महाराज औरंगजेबास भेटण्यास आग्र्यास गेले होते. कारण त्यावेळी बादशाह औरंगजेब आग्र्याहून कारभार पाहत होता. लेखकाच्या किंवा नकलकाराच्या माहितीनुसार, ऐकिवानुसार दिल्ली हीच राजधानी मानली गेलेली दिसते. कालक्रमाच्या बाबतीत विचार केल्यास कलम [13] मध्ये त्या उपर शाहाजी राजे त्यांणी पातशाही नसल व बाईका समेत किले माहोली नजीक कल्याण भिवंडी कोकणांत थोर किला पाहून काही फौज घेऊन कबिला समवेत तेंथे गेले. लुखजी जाधवराऊ त्यांणी मोगलांची फौज उतरेकडील घेऊन पाठिलाग करून मोहोलीस जाऊन फौजसहवर्तमान वेढा साहा महिने घातला[14] असा उल्लेख आलेला आहे. यात लखुजीराव जाधवांचा उल्लेख असून शहाजी राजांनी माहोलीच्या किल्ल्यास वेढा घातल्याचाही उल्लेख आहे. परंतु लखुजीराव जाधवांचा मृत्यू तर 1629 मध्ये झाला होता आणि माहोलीच्या किल्ल्यास वेढा 1636 मधील आहे. म्हणजे या कलमातील वर्णन विसंगत असल्याचे दिसून येते. कलम 70 मध्ये त्याउपर शाहाजी राजे महाराज घोरपडे मारिले हे ऐकताच खुश वख्त जाले. विजयी पुत्र त्यासी भेटी द्यावी हा विच्यार करून फौजेसहवर्तमान देशास आले[15] असे वर्णन आहे. खरेतर शहाजी राजांचा मृत्यू जानेवारी 1664 मधील असून बाजी घोरपडे यांचा मृत्यू ऑक्टो—नोव्हें. 1664 चा आहे. म्हणजेच बाजी घोरपडेच्या अगोदर शहाजी राजांचा मृत्यू झालेला असल्याने यातील वर्णन हे विसंगत ठरते. स्थळकाळ दोषाचा व कालक्रमाच्या दृष्टीने या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

### *सारांशः*

वि. का. राजवाडे यांनी म्हटल्याप्रमाणे कागदपत्रांचे एक अस्सल चिटोरे बखरींचा इतिहास हाणून पाडण्यास पुरेसे आहे. आपले निवेदन कल्पनारम्य करणे, अतिरंजितता, अद्भूतता, लेखकाची भूमिका ही सेवकाची, लेखनिकाची असणे, स्थळकाळाचा विपर्यास, कालक्रमबध्दतेची विसंगती या बखरीतील दोषांमुळे राजवाडेंचे मत काही प्रमाणात खरेही आहे. परंतु गो. स. सरदेसाई यांनी म्हटल्याप्रमाणे बखरीत पुष्कळदा बऱ्याचदा भाकडकथा असूनही लेखकाच्या माहितीप्रमाणें त्यांत कांही अंश खरे अस्सलही निघू शकतात. म्हणून या बखरी त्याज्यही नाहीत व सर्वथा ग्राह्यही नाहीत. त्याप्रमाणे एक्क्याण्णव कलमी बखरीचा विचार करता वरीलप्रमाणे काही दोष, उणिवा या बखरीमध्ये लेखकाकडून राहिलेल्या आहेत. परंतु इतर जी कलमे आहेत त्यात बरीचशी माहिती ही मध्यकालीन इतिहास व मराठ्यांच्या इतिहास लेखनास

VOLUME - 6 | ISSUE -12 | JUNE - 2017

उपयोगी पडते. राजकीय घटनांचे प्रामुख्याने निवेदन बखरींमधून केलेले असले तरीही या बखरीमधून प्रकट होणारा आशय हा समाजशास्त्रीय दृष्टीने इतिहासाच्या अभ्यासाला पूरक व पोषक ठरणारा आहे. समाजाभिमुखता व लोकसंवादी विचारप्रवाहांचे आकलन बखरींतून घडते. मध्ययुगीन भाषा व जीवनव्यवहार यांचे यथार्थ आकलन करण्याचे माध्यम म्हणूनही बखरींकडे पाहता येते व त्याअनुषंगाने राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक पैलूंवर प्रकाश टाकता येतो. फक्त इतर प्राथमिक, अस्सल साधनांशी ती पडताळून पाहणे आवश्यक आहे. प्राथमिक साधनांऐवढे साधनमूल्य या बखरीचे नसले तरी सभासद बखर वगळता इतर बखरींच्या तुलनेत ही बखर काही प्रमाणात मराठेकालीन इतिहासाचे साधन म्हणून उपयुक्त ठरते.

### *संदर्भः*


1. पठाण यु. म., फार्सी—मराठी अनुबंध, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, पृ. 319
2. कुलकर्णी अ. रा. (संपा.), रामचंद्र आमात्यांचे आज्ञापत्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, सुधारित आवृत्ती 2007, पृ. 91—93
3. कित्ता, पृ. 103
4. वाकसकर वि. स. (संपा.), श्री शिवछत्रपतींची 91 कलमी बखर आणि भोसले घराण्याची चरितावली, व्हीनस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, पृ. प्रस्तावना 11
5. मेहेंदळे गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपती, भाग 1, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, द्वितीय पुनर्मुद्रण, 2008, पृ. 96
6. वाकसकर वि. स. (संपा.),उपरोक्त, पृ. 56
7. कुलकर्णी भीमराव (संपा.), मल्हार रामराव चिटणीस विरचित श्रीशिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, पहिली आवृत्ती, 1967, प्रस्तावना, 12
8. मेहेंदळे गजानन भास्कर, उपरोक्त, पृ. 90
9. कुलकर्णी भीमराव (संपा.), उपरोक्त, नांदी, 5
10. वाकसकर वि. स. (संपा.),उपरोक्त, पृ.10
11. कित्ता, पृ. 55
12. कित्ता, पृ. 37
13. कित्ता, पृ. 38
14. कित्ता, पृ. 9
15. कित्ता, पृ. 48

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org